भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/७६**

**डीबीओडी. क्र. आरईटी. बीसी.२२/१२.०१.००१/२०१२-१३** **जुलै ०२, २०१२**
**आषाढ १०, १९३४ (शके)**

सर्व शेड्युल कमर्शियल बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

**महापरिपत्रकात - कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) आणि स्टॅटयुटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)**

जून ३०, २०११ पर्यंत अनुसूचित वाणिज्य बँकांना (एससीबी) सीआरआर/एसएलआरवरील दिलेल्या सूचना मार्गदर्शक तत्वे अद्यावत केलेले आमचे महापरिपत्रकात आरबीआय /२०११-१२/५०डीबीओडी.क्र.आरईटी.बीसी. १३/१२.०१.००१/ २०११ -११दिनांक जुलै ०१, २०११ चा कृपया संदर्भ घ्यावा. हे महापरिपत्रक जून ३०, २०१२ पर्यंत ह्या विषयावर दिलेल्या सूचना समाविष्ट करुन अद्यावत करण्यात आले आहे. हे महापरिपत्रक आरबीआयच्या www.rbi.org.in ह्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे

**आपला,**

**(मुरली राधाक्रिष्णन्)**
**मुख्य महाव्यवस्थापक**
सहः वरीलप्रमाणे

बँक आर्थिक व्यवहार आणि विकास विभाग, सेंटर १, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५ /टेलिफोन क्र.: ९१-२२-२२१८९१३१ फॅक्स क्र. ०२२-२२१५०७७२ ईमेल आयडी :cgmicdbodco@rbi.org.in

**अनुक्रमणिका**


| | | |
|---|---|---|
| १ | परिचय | १ |
| १.१ | कॅश रिझर्व रेशो (सी आर आर) | ३ |
| १.२ | सी आर आर चा प्रतिपाळ करणे | ३ |
| १.३ | वाढता सी आर आर | ४ |
| १.४ | डी टी एल (डिमांड अँड टाईम लायाबिलिटीजचे) चे गणन | ४ |
| १.५ | मागणी दायित्वे | ४ |
| १.६ | मुदत दायित्वे | ४ |
| १.७ | इतर मागणी आणि मुदत दायित्वे (ओ डि टी एल) | ५ |
| १.८ | बँकिंग यंत्रणेमधल्या मालमत्ता | ५ |
| १.९ | भारतीय बँकांनी परदेशातुन घेतलेली कर्जे | ५ |
| १.१० | प्रेषण सुविधेसाठी संबंधीत बँकांशी केलेली व्यवस्था | ५ |
| १.११ | डि टी एल/एन डि टी एल गणनासाठी आंतर्भाव न केली जाणारी दायित्वे | ६ |
| १.१२ | सुट दिलेले प्रवर्ग | ६ |
| १.१३ | एफ सी एन आर (बी) ठेवीं आणि आय बी एफ सी ठेवीं आणि आंतर बँकीय विदेशी मुद्रा (आयबीएफसी) ठेवींमधून दिलेली कर्जे | ७ |
| १.१४ | सी आर आरच्या गणनाची प्रक्रिया | ७ |
| १.१५ | दैनंदिन तत्वावर सी आर आरचा प्रतिपाळ करणे | ७ |
| १.१६ | सी आर आरच्या अंतर्गत आर बी आय कडे एस सी बीज मार्फत ठेवलेल्या रोख शेष राशींसाठी व्याज दिले जाणार नाही. | ७ |
| १.१७ | फॉर्म ए मधला पंधरवड्यातील अहवाल (सी आर आर) | ८ |
| १.१८ | दंड | ९ |
| २ | वैधानिक तरलता गुणोत्तरचा (एस एल आर चा)प्रतिपाळ | ९ |
| २.१ | एस एल आर च्या गणनाची पध्दत | ११ |
| २.२ | एस एल आरसाठी मंजूर केलेल्या सुरक्षा ठेवींचे वर्गिकरण आणि मूल्यांकन | १२ |
| २.३ | दंड | १२ |
| २.४ | फॉर्म ८(एस एल आर) मधला अहवाल | १२ |
| २.५ | वैधानिक लेखापरिक्षकांकडून प्रमाणित केलेली डिटीएलच्या गणनेची अचूकता | १२ |
| ३ | जोडपत्र-I | १३ |
| | जोडपत्र-II | १८ |
| ४ | परिशिष्ट | २१ |

**<u>महापरिपत्रक - कॅश रिझर्व रेशो (सीआरआर आणि स्टॅटयुटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)</u>**

**अ. उद्देश** - ह्या महापरिपत्रका मध्ये राखीव निधींच्या आवश्यकतांबाबतची माहिती स्थूलमानाने विहित करण्यात आली आहे.

**ब. वर्गीकरण - बीआर अधिनियम १९४९ च्या कलम ३५ अ खाली आरबीआयने दिलेले वैधानिक मार्गदर्शक तत्व.**

**क. मागील सूचना - ह्या महापरिपत्रकाच्या तारखेस कार्यवाहीत असलेल्या व रिझर्व बँकेने दिलेल्या परिपत्रकांमधील सूचना ह्या परिपत्रकात एकत्रित करण्यात आल्या आहेत.**

**ड. उपयोगांची व्याप्ती - प्रादेशिक ग्रामिण बँका सोडून हे महापरिपत्रक सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांना (एससीबी) लागु आहे.**

**ई. रचना**

**१. परिचय**

१.१ सी आर आर

२.१ एसएलआर

**२. मार्गदर्शक तत्वे**

१.१ ते १.१८ सी आर आरचे गणन करण्याची पध्दती

२.१ ते २.५ एसएलआरचे गणन करण्याची पध्दती

**३. जोडपत्र**

**४. परिशिष्ट**

**१. परिचय**

एस सी बीज मार्फत सी आर आर आणि एस एल आरमार्फत राखल्या जाणाऱ्या वैधानिक राखीव निधीच्या गरजेचे निरीक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून, रिझर्व बँक ऑफ इंडियाने आर बी आय अधिनियम १९३४ च्या कलम ४२(२) अंतर्गत फॉर्म १ अहवाल (सी आर आर साठी) आणि बँकिंग नियमन अधिनियम १९४९च्या कलम २४ अंतर्गत फॉर्म ८ अहवाल (एस एल आरसाठी )या स्वरुपामध्ये वैधानिक परतावा नमुद केला आहे.

**१.१ सी आर आर**

देशाच्या आर्थिक स्थिरतेला सुरक्षित ठेवण्याच्या गरजेच्या संबंधात रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४ चे कलम ४२(१) एस सी बीज साठी कोणत्याही उच्च दराशिवायच्या सी आर आर विहित करते.

**१.२ सी आर आर चा प्रतिपाळ करणे**

सध्या, मार्च १०, २०१२ रोजी सुरु होणा-या पंधरवड्यापासून, विहित केलेला सीआरआर हा, विभाग १.११ व १.१२ मध्ये चर्चा केलेल्या सूट/सवलतींबाबतची तडजोड केल्यानंतर असलेल्या बँकेच्या एकूण डीटीएलच्या ४.७५ टक्के एवढा विहित करण्यात आला आहे.

### १.३ वाढता सी आर आर

आर बी आय अधिनियम १९३४च्या कलम ४२(१ए) च्या संदर्भामध्ये, एस सी बीं ना अधिनियमाच्या कलम ४२(१)मध्ये दिलेल्या शेष राशींच्या अतिरीक्त ज्यादा सरासरी दैनंदिन शेष राशी ठेवावी लागते, जिची रक्कम भारताच्या राजपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या अधि सूचनेमध्ये रिझर्व बँकेने निर्देशित केलेल्या दरापेक्षा कमी नसावी. अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या तारखेस व्यवसायाच्या समाप्तीवर, तीच्या डि टी एल च्या एकुण रकमेवर अधिनियम १९३४च्या कलम ४२(२)मध्ये संदर्भ घेतलेल्या रिटर्न्समध्ये दाखवल्याप्रमाणे, अतिरीक्त शेष राशीचे गणन बँकेच्या एकुण डि टी एलच्या अतिरीक्त राशीचा संदर्भ घेऊन केले जाते.

सद्यस्थितीमध्ये बँकां द्वारे कोणत्याही वाढत्या सी आर आरचा प्रतिपाळ करण्याची आवश्यकता नाही.

### १.४ डी टी एलचे गणन

बँकेवर असलेल्या जबाबदा-या/दायित्वे ही डिमांड किंवा मुदत ठेवी किंवा घेतलेली कर्जे किंवा जबाबदा-यांच्या संकीर्ण बाबींच्या स्वरुपात असू शकतात. आर बी आय अधिनियम १९३४च्या कलम ४२ अंतर्गत दिल्यानुसार, बँकेची दायित्वे बँकिंग यंत्रणे बद्दल किंवा डिमांड आणि मुदत ठेवींच्या किंवा कर्ज अथवा इतर दायित्व घटकांच्या स्वरुपात असलेल्या इतर घटकांबद्दल असू शकतात. रिझर्व बँक ऑफ इंडियाला आर बी आय अधिनियम १९३४च्या कलम ४२(१सी) अंतर्गत कोणत्याही विशिष्ट दायित्वाचे वर्गिकरण करण्याची अधिकृतता दिलेली आहे आणि त्यामुळे दायित्वाच्या वर्गिकरणाबद्दलच्या कोणत्याही वर्गिकरणाच्या संदर्भामध्ये, बँकांना आवश्यक त्या स्पष्टिकरणासाठी आर बी आयला संपर्क करण्याचा सल्ला दिला जातो.

### १.५ मागणी दायित्वे

बँकेची मागणी दायित्वे म्हणजे, मागणी केल्यावर देय असलेली दायित्वे. यामध्ये चालु ठेवी, मागणी दायित्वे असलेला बचत बँकांच्या ठेवींचा भाग, पत /हमी पत्रांवर ठेवलेली अतिरीक्त रक्कम (मार्जिन), अतिदेय स्थायी ठेवींमधली शेष राशी, रोख प्रमाणपत्रे आणि संचयित /आवर्ती ठेवी, देणे बाकी असलेली टेलीग्राफिक स्थानांतरणे (टी टीज), मेल ट्रान्सफर्स (एम टीज), डिमांड ड्राफ्ट (डीडीज), दावा न केलेल्या ठेवी, कॅश क्रेडिट खात्यामधली क्रेडिट शेष राशी आणि अग्रिम रकमांसाठी सुरक्षा ठेव म्हणुन समजलेल्या ठेवी ज्यांची भरपाई मागणीवर केली जाते ह्यांचा समावेश आहे. मनी ॲट कॉल आणि बँक यंत्रणे बाहेरुन मिळवलेली शॉर्ट नोटिस यांना इतरांवरील दायित्वाच्या ठिकाणी दाखवले जावे.

### १.६ मुदत दायित्वे

बँकेची मुदत दायित्वे म्हणजे, भरपाई केल्या जाणाऱ्या किंवा मागणीवर भरपाई केल्या जाणाऱ्या ठेवी होत. यामध्ये स्थायी ठेवी, कॅश सर्टिफिकेट्स, एकत्रित किंवा आवर्ती ठेवी, बचत बँक ठेवींचा मुदत दायित्व भाग, कर्मचारी सुरक्षा ठेवी, पत पत्रांवर ठेवली जाणारी अतिरीक्त राशी (मार्जिन), मागणी केल्यावर देय नसलेली व सुरक्षा ठेव म्हणून ठेवलेल्या, अग्रिम राशींविरुध्दच्या ठेवी व सुवर्ण ठेवी.

### १.७ इतर मागणी आणि मुदत दायित्वे (ओ डि टी एल)

ओ डि टी एल मध्ये, ठेवींवर उपार्जित व्याज, बील्स पेयेबल, न भरपाई केलेले लाभांश, इतर बँका आणि जनतेस देणे असणाऱ्या रकमेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सस्पेंस खात्यातील शेष राशी, शाखा जुळवणी खात्यातील (ब्रान्च ॲडजस्टमेंट अकाऊंट)मधील निव्वळ क्रेडिट शेष राशी, ठेवी किंवा कर्जांच्या स्वरुपात नसणाऱ्या बँक यंत्रणांना देय असणाऱ्या राशीं ह्यांचा समावेश होतो. अशी दायित्वे पुढील बाबींमुळे उद्भवू शकतात १. इतर बँकांच्या वतीने बिलांचे गोळा करणे, २. इतर बँकांकडून देय असलेले बँक व्याज इ. जर बँकांनी बँकिंग यंत्रणेच्या दायित्वांचे वर्गिकरण ओ डि टी एलच्या एकुण राशीमधुन केले नाही, तर संपूर्ण ओ डि टी एल ला, फॉर्म अ मधील अहवालाच्या इतर डिमांड व टाईम दायित्वे (बाब २ (क)) समोर दाखविला जावा व सर्व एससीबींनी सरासरी सीआरआर ठेवावा. इतर बँकांना दिलेली सहभाग प्रमाणपत्रे, अंतर्गत-शाखा जुळवणी खात्यामधील पाच वर्षापेक्षा जास्त बाकी असलेल्या क्रेडिट नोंदींना वर्गीकृत करण्यासाठीच्या संदर्भातील निर्बंध लावलेल्या खात्यांवरील बाकी शेष राशी, बील परचेस्ड/डिसकाऊंटेड यांच्यावरील अतिरीक्त राशी (मार्जिन मनी) आणि परदेशातुन बँकानी ऋणाच्या स्वरुपात घेतलेले सोने, यांन्जा देखील ओडि टी एल मध्ये आंतर्भूत करावे.

कोलॅटराईज डेरीवेटिव्ह व्यवहारांच्या अंतर्गत मिळवलेल्या कॅश कोलॅटरल्सना देखील राखीव नीधीच्या गरजांसाठी बँकांच्या डि टी एल/एन डि टी एलमध्ये समाविष्ट करुन घ्यावे लागते कारण त्यांची "बाह्य दायित्वांमध्ये" गणना होते.

### १.८ बँकिंग यंत्रणेमधल्या मालमत्ता

बँकिंग यंत्रणेला कर्ज किंवा पुनःभरपाई कराव्या लागणाऱ्या ठेवींच्या स्वरुपामध्ये किंवा पंधरवड्याच्या किंवा कमी काळाच्या तात्काळ सूचनेच्या आणि मनी ॲट कॉल तसेच बँकिंग यंत्रणेला उपलब्ध असणाऱ्या तात्काळ सूचनेच्या स्वरुपामध्ये निधी उपलब्ध करुन दिले जातात. वर नमुद केलेल्या कोणत्याही विभागामध्ये न येणाऱ्या बँकिंग यंत्रणेकडुन देय असलेल्या इतर राशींना देखील बँकिंग यंत्रणेच्या मालमत्तेच्या स्वरुपामध्ये घेतले जाते.

### १.९ भारतीय बँकांनी परदेशातुन घेतलेले कर्ज

भारतीय बँकांनी परदेशातुन घेतलेले कर्ज इतर दायित्वाच्या (लायाबिलिटीज टु अदर्स) स्वरुपामध्ये समजले जाते आणि त्याला राखीव निधीची आवश्यक्ता असते. विदेशात उभे केलेल्या व ठेवलेल्या उच्च टायर २ संलेखांना, राखीव निधींबाबत डीटीएल काढण्यासाठी, जबाबदारी/दायित्व म्हणूनच समजले जाईल..

### १.१० प्रेषण सुविधेसाठी संबंधीत बँकांशी केलेली व्यवस्था

जेव्हा बँक आपल्या गिऱ्हाईकाकडुन प्रेषण सुविधेच्या अंतर्गत निधी स्विकारते, तेव्हा ती रक्कम तिच्या पुस्तकांमध्ये दायित्व (इतरांकडील दायित्व) बनते. निधीला स्विकारणाऱ्या बँकेच्या दायित्वाला तेव्हाच समाप्त करता येते, जेव्हा संबधित बँक स्विकारक बँकेने आपल्या गिऱ्हाईकांना दिलेल्या ड्राफ्ट्सना ऑनर करते. त्यामुळे स्विकारक बँकेकडुन संबंधीत बँकेला प्रेषण सुविधा योजनेच्या अंतर्गत दिली गेलेली ड्राफ्टच्या स्वरुपामधली शेष राशी आणि बाकी न

भरपाई केलेली राशी स्विकारक बँकेच्या खातेपुस्तकांमध्ये, भारतातील इतरांवरील दायित्वाच्या शिर्षाखाली दिसणे गरजेचे आहे आणि या राशीला सी आर आर/एस एल आर उद्देशासाठी, डि टी एलच्या गणने करीता विचाराधीन घेणे गरजेचे आहे.

संबंधीत बँकेमार्फत मिळवलेल्या राशीला इतरांवरील दायित्व असे न दाखवता बँकिंग यंत्रणेच्या दायित्वाच्या स्वरुपामध्ये दाखविणे आवश्यक आहे आणि या दायित्वाला संबंधीत बँकेमार्फत आंतर बँक मालमत्तेवर नेटेड ऑफ करता येते. त्याचप्रमाणे ड्राफ्ट्स/व्याज/लाभांश वॉरंट्स देणाऱ्या बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या राशींना, त्यांच्या पुस्तकांमध्ये बँकिंग यंत्रणेच्या मालमत्तेच्या स्वरुपामध्ये समजले जावे आणि आंतर-बँकीय दायित्वांमधुन नेटेड ऑफ करता येऊ शकते.

**१.११ डि टी एल/एन डि टी एल गणनासाठी आंतर्भाव न केली जाणारी दायित्वे**

खाली दिलेली दायित्वे, सी आर आर आणि एस एल आरच्या उद्देशासाठी दायित्वाचा भाग बनू शकत नाहीतः

अ) भरणा झालेले भांडवल, राखीव निधी आणि बँकेच्या नफा आणि तोटा खात्यातील कोणत्याही क्रेडिट शेष राशी, आर बी आय कडुन कर्ज घेतलेली राशी आणि एक्झिम बँक, एन अँच बी, नार्बार्ड आणि एस आय डि बी आयकडून घेतलेली पुनर्वित्त सहाय्य राशी;

ब) निव्वळ उत्पन्न कर तरतुद;

क) दाव्यांवर डि आय सी जी सी कडुन मिळालेली व त्यांच्या तडजोडी प्रलंबित असल्याने बँकांनी ठेवलेल्या रकमा;

ड) हमीचे आवाहन करून ई सी जी सी कडून मिळालेली रक्कम

ई) न्यायालयाकडून निवाडा बाकी असलेल्या दाव्यांच्या अनौपचारिक तडजोडीवरुन विमा कंपनीकडून मिळालेली रक्कम;

एफ) कोर्ट रिसिव्हर कडून मिळालेली राशी;

ग) बँकर्स स्विकारण सुविधेच्या (बी ए एफ)अंतर्गत मर्यादांच्या उपयोगावर उद्‌भवणारी दायित्वे;

ह) ग्रामिण जिल्हा विकास एजन्सी (डि आर डि एअ) सबसिडी रु.१००००/- (स्वयं मदत गटांच्या नावावर सबसिडी राखीव निधी खात्यामध्ये ठेवलेली.)

आय) ग्रामिण गोदामांच्या बांधकाम/सुधारणा/विस्तारासाठी गुंतवणुक सबसिडी योजनेच्या अंतर्गत नाबार्डमधुन दिलेली सबसिडी;

जे) ट्रेडिंग पोर्टफोलिओ अंतर्गत डेरीव्हेटिव्ह व्यवहारांमधुन उत्पन्न होणारा वसुल न झालेला निव्वळ नफा/तोटा;

के) वार्षिक शुल्क आणि परतावा न होणारे इतर शुल्क यांच्या स्वरुपात आधीच मिळालेल्या उत्पन्नाचा स्त्रोत.

एल) आर बी आयद्वारे मंजूरी मिळालेल्या पात्र वित्तसहाय्य संस्थांकडून रिडिसकाऊंट केलेले बील आणि

एम) अतिरीक्त दायित्वाच्या संविदा पत्रातुन आणि नफा व तोटा खात्यातुन उत्पन्न होणारी विशिष्ट प्रकारचे दायित्व म्हणुन गणली न गेलेली तरतुद.

**१.१२ सुट दिलेले प्रवर्ग**

खालील दायित्वांवर सी आर आर राखण्यावर एस सी बीज ना सुट दिली गेली आहे :

i. आर बी आय अधिनियम १९३४च्या कलम ४२(१)च्या खंड (ड)च्या स्पष्टिकरणाच्या अंतर्गत गणन केलेली

भारतीय बँकिंग यंत्रणेवरील दायित्वे;

ii. ए सी यु (यु एस$)खात्यातील क्रेडिट शेष रक्कम;

iii ऑफशोअर बँकिंग युनिट्स (ओ बी यु) च्या संदर्भातील डिमांड आणि मुदत दायित्वे आणि

iv एस सी बीजना १५ दिवसांची आणि त्यापेक्षा जास्त आणि एक वर्षा पर्यंतची मूळ परिपक्वता असलेल्या अंतर्गत बँक मुदत ठेवी/मुदत कर्ज दायित्वांना बॅंकिंग यंत्रणेच्या दायित्वांमध्ये (फॉर्म ए परताव्यातील घटक १) सहभागी करुन घेण्याची आवश्यकता नसते. त्याचप्रमाणे बँकांनी मुदत ठेवींमधुन त्यांच्या अंतर्गत बँक मालमत्तेला आणि १५ दिवसांची आणि त्यापेक्षा जास्त आणि एक वर्षा पर्यंतची मूळ परिपक्वता असलेल्या अंतर्गत बँक मुदत ठेवी/मुदत कर्ज दायित्वांना बॅंकिंग यंत्रणेच्या मालमत्तेमधुन (फॉर्म ए अहवालातील घटक ३)सी आर आरच्या प्रतिपाळासाठी वजा करण्याची आवश्यकता नसते. या ठेवींवर मिळालेल्या व्याजाला राखीव निधीच्या गरजेतुन देखील सुट मिळते.

**१.१३ एफ सी एन आर (बी) ठेवीं आणि आय बी एफ सी ठेवीं मधून दिलेली कर्जे**

परदेशी चलन अनिवासी(बँक)खात्यांवरील कर्जे, (एफ सी एन आर (बी) ठेवी योजना) आणि आंतर-बँकीय परदेशी चलन (आय बी एफ सी) ठेवी यांना फॉर्म ए परताव्यामध्ये विवरण देताना बँक क्रेडिटचा भाग म्हणुन आंतर्भूत करणे आवश्यक आहे. अहवालाच्या उद्देशासाठी, बँकांनी, त्यांच्या एफसीएनआर (बी) ठेवी, विदेशातील विदेशी मुद्रेमधील ॲसेट्स आणि चार प्रकारच्या विदेशी मुद्रांमधील भारतातील बँक क्रेडिट ह्यांचे, फेडाईने दुपारी १२.०० वाजता घोषित केलेल्या निर्देशक दरांच्या ऐवजी, रिझर्व बँकेने तिच्या वेबसाईटवर घोषित केलेल्या रेफरन्स दरांनुसार भारतीय रुपयांमध्ये रुपांतरण करावे.

**१.१४ सी आर आरच्या गणनाची प्रक्रिया**

बँकांचे रोख व्यवस्थापन सुधारण्यासाठी, सुलभतेचा पर्याय म्हणुन, ६ नोव्हेंबर १९९९च्या पंधरवड्याच्या सुरुवातीला बँकांमार्फत दिलेल्या सी आर आरच्या प्रतिपाळामध्ये एका पंधरवड्याचा अवकाश सुरु करण्यात आला आहे.

**१.१५ दैनंदिन तत्वावर सी आर आरचा प्रतिपाळ करणे**

बेंकांच्या पंधरवड्यातील रोख प्रवाहावर अवलंबून असलेल्या राखीव निधीला ठेवण्याची आदर्श निती निवडण्याची लवचिकता देण्याच्या उद्देशाने, सर्व एस सी बीज ना २८ डिसेंबर २००२च्या पंधरवड्याच्या आरंभापासून, आठवड्यांच्या सर्व अहवालाच्या पंधवड्यासाठी आवश्यक असलेल्या दैनंदिन राखीव निधीच्या ७० टक्क्यांपर्यंत किमान सी आर आर शिल्लक ठेवणे आवश्यक आहे.

**१.१६ सी आर आरच्या अंतर्गत आर बी आय कडे एस सी बीज मार्फत रोख शेष राशींसाठी व्याज दिले जाणार नाही.**

आर बी आय अधिनियम १९३४ मध्ये केलेल्या बदलाच्या अनुसार, (कलम ४२चा उपविभाग (१ बी) वगळून), रिझर्व बँक, एस सी बीज द्वारे ठेवलेल्या सी आर आर शेष राशींवर ३१ मार्च २००७ ला सुरु होणाऱ्या पंधरवड्या पासुन व्याज देणार नाही.

## १.१७ फॉर्म ए मधील पंधरवड्यातील अहवाल (सी आर आर)

आर बी आय अधिनियम १९३४च्या कलम ४२(२) अन्वये, सर्व एस सी बीज् ना, प्रेस निवेदन तयार करण्यासाठी, फॉर्म ए मधील तात्पुरता अहवाल, संबंधीत पंधरवड्याच्या समाप्तीच्या ७ दिवसांच्या आत रिझर्व बँकेला सादर करणे गरजेचे आहे. अंतिम फॉर्म ए संबंधीत पंधरवड्याच्या समाप्तीच्या २० दिवसांच्या आत बी आयकडे प्रस्तुत करावा. वित्त पुरवठ्यावरील कार्यकारी गट : ॲनालिटिक्स अँड मेथडॉलॉजी ऑफ कंपायलेशन ह्यांच्या शिफारशींनुसार , भारतातील सर्व एस सी बीज् ना, ९ ऑक्टोबर १९९८च्या पंधरवड्याच्या आरंभापासुन, भरणा केलेले भांडवल, राखीव निधी, लघु मुदतीला(एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी नियम पत्र परिपक्वतेच्या) आणि दिर्घ मुदतीला ( एका वर्षापेक्षा जास्त नियमपत्र परिपक्वतेच्या) आंतर्भूत करणाऱ्या मुदत ठेवी, ठेवींची प्रमाणपत्रे, एन डि टी एल, एकुण सी आर आर आवश्यकता इ. जोडपत्र/परिशिष्ठ अ ला फॉर्म एला सर्व परदेशी चलन दायित्वांना आणि मालमत्तांना दर्शवित आणि परीशिष्ठ/जोडपत्र बी ला फॉर्म ए ला मंजूर केलेल्या सर्व सुरक्षा ठेवींमधल्या गुंतवणुकिची, मंजूरी न मिळालेल्या सुरक्षा ठेवींमधल्या गुंतवणुकिची माहिती शेयर्स/डिबेंचर्स/प्राथमिक बाजारपेठेतील बाँडला केलेल्या सबस्क्रिप्शन आणि खाजगी प्लेसमेंट मार्फत केलेली सबस्क्रिप्शन चे वर्णन करणाऱ्या मेमोरंडम टू फॉर्म ए रीटर्नला प्रस्तुत करणे गरजेचे आहे. फॉर्म ए परताव्याचे विवरण देण्यासाठी, बँकांनी त्यांच्या ओवरसीज फॉरेन करन्सी मालमत्तांना, युएस डॉलर, जी बीपी, जपानी येन आणि युरो या ४ प्रमुख चलनातील परकिय चलनातील भारतातील बँक क्रेडिटला विवरण देण्याच्या शुक्रवारी क्रेडिटला फॉरेन एक्सचेंज डिलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एफ ई डि ए आय ) ह्यांनी दुपारी १२.०० वाजता घोषित केलेल्या दराऐवजी, आरबीआयने तिच्या वेबसाईटवर घोषित केलेल्या रेफरन्स दराने रुपयामध्ये रुपांतरीत करणे आवश्यक आहे

एस सी बीज मार्फत मागणी/डिमांड दायित्वांच्या आणि मुदत ठेवींच्या गुणोत्तराचे गणन करण्याची वर्तमान पध्दत त्यांच्या बचत बँक मुदतीच्या संदर्भात असून, प्रत्येक वर्षाच्या ३० सप्टेंबर आणि ३१ मार्चला व्यापाराच्या समाप्तीवर असलेल्या स्थितीच्या आधारावर केले जाईल (सी एफ. आर बी आय पत्रक डीबीओडी.क्र.बिसी. १४२/०९.१६.००१/९७-९८ दिनांक १९ नोव्हेंबर १९९७) आणि बचत बँक ठेवींवर दैनंदिन फलिताच्या आधारवर नवीन व्याज गणन यंत्रणेमध्ये सुरु ठेवले जाईल. अर्ध वार्षिक कालावधीच्या प्रत्येक महिन्यामध्ये राखली जाणारी सरासरी किमान शिल्लक, बँकेमार्फत बचत बँक खात्यांच्या मुदत दायित्वाचा भागाचे प्रतिनीधीत्व करणारी रक्कम म्हणुन समजली जाते. जेव्हा अशी रक्कम, अर्ध वार्षिक काळाच्या दरम्यान राखल्या जाणाऱ्या वास्तविक शिलकींच्या सरासरीमधुन वजा केली जाते तेव्हा मिळणारा फरक मागणी दायित्व भागाचे प्रतिनीधीत्व करतो. मागणीचा आणि मुदत ठेवींचा, प्रत्येक अर्ध्या वर्षासाठी ठेवलेला भाग, पुढच्या अर्ध वर्षादरम्यानच्या सर्व पंधरवड्यांचे विवरण देण्यासाठी बचत बँक ठेवींच्या येणाऱ्या मागणी आणि मुदत दायित्व घटकांसाठी लागु केला जातो.

### १.१८ दंड

२४ जून २००६ रोजी सुरु होणा-या पंधरवड्या पासुन, एस सी बीज द्वारे सी आर आर दर राखण्यात कसुरी झाल्यास, खालील प्रकारे दंडांत्मक व्याज आकारले जाईलः

(i) सद्य स्थितीमध्ये, एकुण सी आर आर आवश्यकतेच्या ७०% असल्याच्या स्थितीत, दैनंदिन तत्वावर सी आर आर आवश्यकतेला राखण्यामध्ये कसुरी झाल्यास, त्या दिवसासाठी बँक दराच्या वर तीन टक्के प्रतिवर्ष एवढ्या दराने त्या दिवसाच्या किमान दरावर पोहोचण्यासाठी जेवढ्या रकमेची कमतरता आहे, त्या रकमेवर दंड व्याज वसुल केले जाईल आणि कमतरता पुढील काही दिवसांसाठी सुरु राहिली, तर बँक दराच्या वर पाच टक्के प्रतिवर्ष एवढ्या दराने दंड व्याज वसुल केले जाईल.

(ii) पंधरवड्या दरम्यान सरासरी आधारावर सी आर आर राखण्यामध्ये कसुरी झाल्यास रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम १९३४च्या कलम ४२च्या उपभाग ३ मध्ये दिल्याप्रमाणे दंड व्याज वसुल केले जाईल.

एस सीबीजना दिनांक, रक्कम, टक्केवारी, आवश्यक असलेला सी आर आर न राखण्याच्या कसुरी चे कारण, या स्वरुपात माहिती सादर करावी लागेल आणि अशा प्रकारची कसुरी पुन्हा होणार नाही यासाठी केलेल्या उपायांची माहिती द्यावी लागेल.

## २. वैधानिक तरलता गुणोत्तरचा (एस एल आर चा)प्रतिपाळ

बँकिंग नियमन अधिनियम १९४९च्या कलम २४ मध्ये, बँकिंग नियमन (बदल) अधिनीयम २००७ मार्फत बदल केल्याच्या अनुषंगाने, नियमन (बदल) नियुक्ती २००७ २३ जानेवारी २००७ पासुन बदलण्यात आली व त्यानुसार, रिझर्व बँक एस सी बीज साठी विशिष्ट मालमत्तेमध्ये एस एल आर देऊ शकते. बँकिंग नियमन अधिनियम १९४९च्या कलम २९मध्ये बँकिंग नियमन (बदल) अधिनीयम २००७ मार्फत बदल केल्याच्या अनुषंघाने, नियमन (बदल) नियुक्ती २००७ २३ जानेवारी २००७ पासुन बदलण्यात आकी, रिझर्व बँक एस सी बीज साठी विशिष्ट मालमत्तेमध्ये एस एस आर देऊ शकते. एससीबीच्या अशा ॲसेटचे मूल्य, रिझर्व बँकेने, प्राधिकृत राजपत्राद्वारे, वेळोवेळी विहित केल्यानुसार, मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या, त्या एससीबीच्या, भारतामधील एकूण डीटीएलच्या ४० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

एस सी बीज मार्जिनल स्टँडिंग सुविधा योजनेमध्ये (एम एस एफमध्ये) सहभागी होऊ शकतात, ज्याची सुरुवात रिझर्व बँकेने ९ मार्च २०११पासुन केली आहे. ह्या सुविधेखाली, पात्र असलेल्या संस्था, एप्रिल १७, २०१२ पासून, मागील दुस-या पंधरवड्याच्या अखेरीस, आऊटस्टँडिंग असलेल्या एनडीटीएलच्या दोन टक्के पर्यंतचे कर्ज घेऊ शकतात. ह्याशिवाय, पात्र असलेल्या संस्था, ह्या सुविधेखाली, त्यांच्या अतिरिक्त एसएलआर विरुध्द ओव्हरनाईट निधी मिळविणे सुरु ठेवू शकतात. बँकांचे एसएलआर होल्डिंग, वैधानिक अशा, एनडीटीएलच्या दोन टक्क्यांपेक्षा कमी झाल्यास, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २४च्या, पोटकलम (२अ) खाली दिलेल्या अधिसूचनेनुसार, एसएलआर ठेवण्याचे पालन करण्याबाबतचा विशिष्ट वेव्हर चा आधार घेण्याचे दायित्व बँकांवर असणार नाही.

रिझर्व बँकेने आपल्या सूचना क्र. डीबीओडी.क्र.आरईटी९१/१२.०२.००१/२०१०-११ दिनांक ९ मे २०११मध्ये हे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक एस सी बी, खाली दिल्याप्रमाणे भारतीय मालमत्ता बाळगु शकतात, ज्यांचे मूल्य, कोणत्याही दिवशी व्यवसायाच्या होणाऱ्या समाप्तीच्या वेळी, येणाऱ्या दुसऱ्या आठवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी, सूचना क्र. डीबीओडी.क्र.आरईटी.बीसी.६६/१२.०२.००१/२०१०-११ दिनांक १६ डिसेंबर २०१०मध्ये दिल्याप्रमाणे, दुसऱ्या एकुण निव्वळ मागणी आणि मुदत दायित्वांच्या २४ टक्क्यांपेक्षा कमी नसणे गरजेचे आहे, हे मूल्यांकन रिझर्व बँकेने वेळोवेळी नमुद केलेल्या मूल्यांकन पध्दतीनुसार असेलः

(अ) रोख रक्कम किंवा

(ब) विद्यमान बाजार मूल्यांपेक्षा अधिक नसलेल्या दराने केलेले सोन्याचे मूल्यांकन, किंवा

(क) वैधानिक तरलता गुणोत्तर (एस एल आर) सुरक्षा ठेवी म्हणुन संदर्भ घेतला जाणाऱ्या खालील उपकरणांमध्ये केलेली गुंतवणुकः

(i) ६ मे २०११पर्यंत वितरीत केल्या गेलेल्या दिनांकित सुरक्षा ठेवी ज्यांना डीबीओडी.क्र.आरईटी ९१/१२.०२.००१/२०१०-११ दिनांक ९ मे २०११च्या सूचनेच्या जोडपत्रामध्ये सूचीबध्द केले गेले आहे.

(ii) भारत सरकारची राजकोष बिले;

(iii) बाजारपेठ कर्ज कार्यक्रमाच्या आणि बाजापेठ स्थिरत्व योजनेच्या अंतर्गत वेळोवेळी भारत सरकारमार्फत वितरीत केलेल्या दिनांकित सुरक्षा ठेवी;

(iv) वेळोवेळी राज्य शासनाने बाजारपेठ कर्ज कार्यक्रमाच्या अंतर्गत वितरीत केलेली राज्य विकास कर्जे (एस डि एल); आणि

(v) रिझर्व बँक ऑफ इंडियाने अधिसूचित केलेले इतर कोणतेही संलेख.

मात्र, वर संदर्भित केलेल्या सिक्युरिटीज (मार्जिन सह), रिझर्व बँक-लिक्विडिटी ॲडजस्टमेंट सुविधेखाली (एलएएफ) मिळवलेली असल्यास, त्यांना ह्या उद्देशासाठी पात्र असलेले ॲसेट म्हणून समजण्यात येणार नाही.

**स्पष्टिकरणः** वरील उद्देशासाठी, बाजारपेठ कर्ज कार्यक्रमाचा अर्थ, भारत सरकारने आणि राज्य सरकारने जनतेकडुन उभारलेले स्वदेशी रुपये कर्ज, आणि त्याचा सांभाळ रिझर्व बँक ऑफ इंडियामार्फत, मार्केटेबल सुरक्षा ठेवींच्या वितरणाने केला जात असून, त्याचे नियंत्रण शासन सुरक्षा ठेव अधिनियम २००६ आणि त्याच्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांनी, लिलाव किंवा या संबंधीत जाहिर केलेल्या इतर कोणत्याही पध्दतीने केले गेले आहे.

२. बाधित एस एल आर सुरक्षा ठेवीं वर दिलेली टक्केवारी काढण्यासाठी आंतर्भूत केल्या जाणार नाहीत.

मात्र, इथे नमुद केलेल्या मालमत्तेच्या टक्केवारीच्या गणनासाठी खालील बाबींचा समावेश केला जाईल :

(i) इतर संस्थांकडे ठेवलेल्या सुरक्षा ठेवी ज्यांचा लाभ अग्रिम रक्कमेसाठी किंवा अशा मर्यादेपर्यंत केलेल्या इतर क्रेडिट व्यवस्थेसाठी, त्या मर्यादेपर्यंत या सुरक्षा ठेवी काढल्या जाणार नाहीत किंवा त्यांचा घेतला जाणार नाही; आणि

(ii) बँकेच्या आवश्यक असलेल्या एस एल आर पोर्टफोलियोतून काढल्या गेलेल्या एकुण एन डि टी एल च्या दोन टक्के एवढ्या मार्जिनल स्टँडिंग सुविधेच्या (एम एस एफ)मार्फत तरलता सहकार्य मिळवण्यासाठी रिझर्व बँकेच्या अनुषंघाने देऊ केलेल्या सुरक्षा ठेवी.

३. ह्यासाठीची रक्कम काढण्यासाठी, पुढील बाबींना भारतात ठेवलेली रोकड समजले जाईलः

(i) बँकिंग नियमन अधिनियम १९४९च्या कलम ११च्या एप भाग २ अंतर्गत आवश्यकता असलेल्या ठेवी, ज्या भारताबाहेर स्थापना केलेल्या बँकिंग कंपनीमार्फत रिझर्व बँकेकडे ठेवल्या जातात

(ii)अनुसुचित बँकेद्वारे रिझर्व बँकेकडे ठेवलेली कोणतीही शिल्लक रक्कम, जी रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियमाच्या (१९३४ चा २) अंतर्गत आवश्यक असलेल्या शिल्लक रकमेच्या अतिरीक्त असते.

(iii) भारतातील इतर अनुसूचित वाणिज्य बँकांकडे चालु खात्यांमध्ये असलेल्या निव्वळ शिल्लक रकमा.

**टीपः**

१. शासकिय सुरक्षा ठेवीच्या एस एल आर स्थितीची माहिती जाहिर करण्याच्या दृष्टिकोनातुन असे ठरवण्यात आले आहे की,:

(i) भारत सरकार आणि राज्य शासनांनी वितरीत केलेल्या सुरक्षा ठेवींची एस एल आर स्थिती सुरक्षा ठेवींच्या वितरणाच्या वेळी रिझर्व बँक ऑफ इंडिया मार्फत केलेल्या वृत्तपत्र प्रकाशनामध्ये दर्शविली जाईल. आणि

(ii) अद्ययावत स्वरुपामधली एस एल आर सुरक्षा ठेवींची सद्यस्थितीतीला सूची डेटाबेस ऑन इंडियन इकोनॉमी या लींकच्या स्वरुपामध्ये रिझर्व बँकेच्या www.rbi.org.in वेबसाईट/संकेत स्थळावर जाहिर केली जाईल.

२. रोख व्यवस्थापन बिलाला भारत सरकारच्या राजकोष बिलाप्रमाणे वागणुक दिली जाईल आणि त्यानुसार त्याला एस एल आर सुरक्षा ठेवींच्या स्वरुपात वर्तवणुक दिली जाईल.

## २.१ एस एल आर च्या गणनाची पध्दत

बी आर अधिनियम १९४९ च्या कलम २४(२)(बी)च्या अंतर्गत एस एल आर साठी एकुण एन डी टी एलचे गणन

करण्याची पध्दत स्थूलपणे सी आर आर काढण्याच्या पध्दतीच्या प्रमाणे आहे. भाग १.११ च्या अंतर्गत दिलेली दायित्वे एस एल आर साठी देखील दायित्वाचा भाग ठरणार नाहित.एस सी बीजना आंतर-बँकीय मुदत ठेवींच्या/सर्व परिपक्वतांच्या मुदत कर्ज दायित्वाच्या स्वरुपात बँकिंग यंत्रणेच्या दायित्वामध्ये समाविष्ट करुन घेणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे, बँकांनी त्यांच्या मुदत ठेवींच्या आंतर-बँकीय मालमत्तेला आणि सर्व परिपक्वतांच्या मुदत ठेवींना बँकिंग यंत्रणेच्या दायित्वांमध्ये सामिल करुन घेणे एसएलआरसाठी एनडीटीएल काढण्यासाठी महत्वाचे आहे.

## २.२ एस एल आरसाठी मंजूर केलेल्या सुरक्षा ठेवींचे वर्गिकरण आणि मूल्यांकन

एस एल आरसाठी मंजूर केलेल्या सुरक्षा ठेवींचे वर्गिकरण आणि मूल्यांकनाच्या संदर्भामध्ये, बँकांना आमच्या मास्टर महापरिपत्रकात (ज्याचे अद्ययतन वेळोवेळी केले जाते)असलेल्या वर्गिकरणाच्या, मूल्यांकनाच्या आणि बँकांमार्फत गुंतवणुक सूचीच्या कार्यान्वयासाठीच्या अर्थपूर्ण नियमांबद्दलच्या सूचनांमार्फत मार्गदर्शन मिळू शकेल.

## २.३ दंड

जर बँकिंग कंपनी आवश्यक असलेल्या एस एल आर राखण्यास असमर्थ ठरल्यास. या कसुरीच्या संदर्भामध्ये ती आर बी आयला त्या दिवशीच्या कमतरता असलेल्या रकमेवर, बँक दरावर तीन टक्के प्रतिवर्ष दराने दंड व्याजाची रकमेच्या स्वरुपामध्ये द्यावी लागेल. जर पुढील कामकाजाच्या दिवशी ही कमतरता आढळून आल्यास संबधीत दिवसांसाठी बँक दराच्या वर पाच टक्के प्रतिवर्ष एवढ्या दराने दंड व्याज वसुल केले जाईल.

## २.४ फॉर्म ८(एस एल आर) मधला अहवाल

i. बँकांनी प्रत्येक महिन्याच्या २०व्या दिवसाच्या आत, प्रत्येक एका आडच्या शुक्रवारी असलेल्या एस एल आरच्या रकमेला फॉर्म ८च्या परताव्याला सादर करणे आवश्यक आहे, हे सादरीकरण पुढे लगेच येणाऱ्या महिन्याच्या दरम्यान अशा शुक्रवारी किंवा अशा शुक्रवारी जर सार्वजनिक सुट्टी असेल तर पराक्रम्य संलेख अधिनियम १९८१ नुसार मागील दिवशी व्यवसायाच्या समाप्तीनंतरत्यांच्या भारतातील डि टी एलच्या माहितीसोबत केले जावे .

ii. बँकांनी फॉर्म ८च्या जोडपत्राच्या स्वरुपात खालील बाबींच्या दैनंदिन स्थितीचे विवरण द्यावेः अ) एस एल आरच्या अनुपालनासाठी सुरक्षा ठेवींचे मूल्य ब)दिलेल्या पध्दतीनुसार आर बी आय सोबत त्यांच्यामार्फत राखली गेलेली अतिरीक्तरोख शिल्लक रक्कम. क) प्रतिभूतींच्या मुल्यांकनाची रीत.

## २.५ वैधानिक लेखापरिक्षकांकडून प्रमाणित केलेली डिटीएलच्या गणनेची अचूकता

वैधानिक लेखापरिक्षकांनी बँकेच्या पुस्तकांप्रमाणे असलेले बाह्य दायित्वांचे सर्व घटक बँकांमार्फत पूर्ण केले असल्याचे आणि पंधवड्याच्या/मासिकतत्वावर रिझर्व बँकेला आर्थिक वर्षासाठी प्रस्तुत केल्या जाणाऱ्या सद्यस्थितीतील डि टी एल/एन डि टी एलमध्ये अचुकपणे दर्शवले गेल्याची तपासणी करणे आणि प्रमाणित करणे गरजेचे आहे.

## फॉर्म - अ

**(राज्य केंद्रीय सहकारी बँक नसलेल्या अधिसूचित बँकेने सादर करावयाचा)**

शुक्रवार ....... रोजी व्यवहारबंद झाल्यावर असलेल्या स्थितीचे विवरणपत्र

(रक्कम जवळच्या हजारांपर्यंत राउंड ऑफ करावी)

बँकेचे नाव :

१. भारतामधील बँकिंग प्रणालीला असलेल्या जबाबदाऱ्या [२]
अ) बँकांकडील डिमांड व टाईम ठेवी
ब) बँकाकडून घेतलेली कर्जे [3]
क) इतर डिमांड व टाईम जबाबदाऱ्या [४]
**१ ची एकूण बेरीज**
२. भारतामधील अन्यांबाबतच्या जबाबदाऱ्या
अ) एकूण ठेवी (बँकांकडून असलेल्या सोडून अन्य)
१) डिमांड
२) टाईम
ब) कर्जे [५]
क) इतर डिमांड व टाईम जबाबदाऱ्या
**२ ची एकूण बेरीज**
**१ + २ ची एकूण बेरीज**
३. भारतामधील बँकिंग प्रणाली मधील ठेवी
अ) बँकांमधील शिल्लकी
१) चालु खात्यांमधील
२) इतर खात्यांमधील
ब) कॉल व शॉर्ट नोटिसमधील पैसा
क) बँकांना दिलेल्या अग्रिम राशी म्हणजे बँकांकडून येणे असलेले येणे.
ड) इतर ॲसेट्स
**३ ची एकूण बेरीज**

[१] एखाद्या अनुसूचित बँकेच्या एका किंवा अधिक कार्यालयांमध्ये शुक्रवार हा निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अधिनियम १८८१ (१८८१ चा २६) खाली सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास, अशा कार्यालयांबाबत आदल्या कामाच्या दिवशीचे आकडे अहवालात दिले जावेत परंतु ते शुक्रवारशीच संबंधित असतील.

[२] ह्या अहवालात कोठेही 'बँकिंग प्रणाली' किंवा 'बँक्स' ह्यांचा अर्थ, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ (१) च्या खाली दिलेल्या स्पष्टीकरणामधील खंड (१) ते (४) मध्ये संदर्भित केलेल्या बँका किंवा इतर कोणत्याही वित्तीय संस्था असा असेल.

[3] आरआरबींच्या बाबतीत प्रायोजक बँका सोडून

[४] १ (क) मधील रक्कम, २(क) पासून वेगळी देणे शक्य नसल्यास ती रक्कम २(क) मधील रक्कमेमध्ये समाविष्ट करता येईल. अशा बाबतीत, बँकिंग सिस्टिमवर असलेली निव्वळ जबाबदारी (नेट लायाबिलिटी) १ (अ) ची एकूण बेरीज व (३) च्या एकूण रकमेपेक्षा १ (ब) ची अधिक/अतिरिक्त रक्कम काढली जाईल.

[५] रिझर्व बँक, नॅशनल बँक फीऍर ॲग्रिकल्चर आणि रुरल डेव्हलपमेंट एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक ऑफ इंडिया सोडून अन्य.

**४. भारतामधील रोकड (म्हणजे हातातील रोकड)**
**५. भारतामधील गुंतवणुकी (पुस्तकी मूल्यानुसार)**
अ) ट्रेझरी बिले, ट्रेझरी डिपॉझिट रिसीट्स, ट्रेझरी सेव्हिंग्ज सर्टिफिकेटे व पोस्टाची दायित्वे ह्यासह केंद्र व राज्य सरकारांच्या सिक्युरिटीज्
ब) इतर मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज
**५ ची एकूण बेरीज**
६. भारतामधील बँक क्रेडिट (आंतर - बँकीय अग्रिम राशी सोडून)

अ) कर्जे, कॅश क्रेडिट व ओव्हरड्राफ्ट्स
ब) खरेदी व डिस्काउंट केलेली इनलंड बिले
१)खरेदी केलेली बिले
२) डिस्काउंट केलेली बिले
क) खरेदी व डिस्काउंट केलेली बिले
१) खरेदी केलेली बिले
२) डिस्काउंट केलेली बिले
**६ ची एकूण बेरीज**

३+४+५+६ ची एकूण बेरीज

**अ) भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ साठी निव्वळ जबाबदाऱ्या = (बँकिंग सिस्टिमवरील निव्वळ जबाबदारी) + (भारतामधील इतरांवरील जबाबदाऱ्या) म्हणजे (१-३) + २ फक्त (१-३) ही धनराशी असल्यास किंवा (१-३) ही उणे राशी असल्यास फक्त २.**

ब) ह्या अधिनियमाखाली भारतीय रिझर्व बँकेकडे ठेवावयाच्या किमान ठेवीची रक्कम (जवळील रुपयापर्यंत राउंड ऑफ केलेली)

क) बचत बँक खाते/विनियम ७ अनुसार)
भारतामधील डिमांड लायाबलिटीज्
भारतामधील टाईम लायाबलिटीज्

स्थळः
तारीख :
फॉर्म अ साठी पत्रक

**१) भरणा झालेले भांडवल**
१.१ राख़ीव निधी
**२) टाईम डिपॉझिट्स**
२.१ लघु मुदतीच्या
२,.२ दीर्घ मुदतीच्या

**३) ठेवींची प्रमाणपत्रे**
**४) निव्वळ डिमांड व टाईम जबाबदाऱ्या (जोडपत्र अ मधील झिरो रिझर्व प्रिस्क्रिप्शन खालील जबाबदाऱ्या वजा करुन)**
**५) सीआरआर च्या विद्यमान दरानुसार ठेवावयाच्या ठेवींची रक्कम/**
**६) भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४२ व ४२ (१ अ)खालील आरबीआयच्या विद्यमान सूचनांनुसार सीआरआर ठेवणे आवश्यक असलेली अन्य जबाबदारी.**
**७) भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४२ व ४२ (१ अ)खालील सूचनांनुसार ठेवणे आवश्यक असलेला एकूण सीआरआर.**

**जोडपत्र - अ**

**(रक्कम जवळच्या हजारापर्यंत राउंड ऑफ करावी)**

**बँकेचे नावः**

| बाबी | पुस्तकी मूल्यानुसार आउटस्टँडिंग | पूनर्मूल्यांकन मूल्य | व्याज |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **जबाबदाऱ्या**<br>**भारतातील इतरांसाठी जबाबदाऱ्या** | | | |
| **१ अनिवासी ठेवी**<br>(१.१ +१.२+१.३+१.४)<br>१.१ अनिवासी बाह्य रुपये खाते (एनआरई)<br>१.२ अनिवासी अप्रत्यावर्तनीय रुपये खाते (एनआरएनआर)<br>१.३ विदेशी मुद्रा अनिवासी बँक योजना(एफसीएनआर(बी))<br>(१.३.१ + १.३.२)<br>१.३.१ लघु मुदतीचे [१]<br>१.३.२ दीर्घ मुदत [२]<br>१.४ इतर (तपशील द्यावा) | | | |
| **२. इतर ठेवी/योजना**<br>(२.१ + २.२ + २.३ + २.४ + २.५ +२.६)<br>२.१ एक्सचेंज अर्नर्स फॉरिन करन्सी<br>२.२ निवासी विदेशी मुद्रा खाती<br>२.३ एस्क्रो खाती (भारतीय निर्यातदारांची)<br>२.४ प्रिशिपमेंट क्रेडिट अकाउंटसाठी फॉरिन क्रेडिट लाईन आणि बिलांचे ओव्हरसीज रिडिस्काउंटिंग<br>२.५ एसीयु (युएस डॉलर्स) खात्यामधील जमा शिल्लक<br>२.६ इतर (तपशील द्यावा). | | | |
| **३. भारतामधील बँकिंग सिस्टिमवरील विदेशी मुद्रा जबाबदाऱ्या**<br>(३.१+१११.२)<br>३.१ आंतर बँकीय विदेशी मुद्रा ठेवी<br>३.२ आंतर बँकीय विदेशी मुद्रा कर्जे | | | |
| **४. विदेशातील कर्जे** [३] | | | |
| **ॲसेट्स**<br>**१. भारतामधील बँकिंग प्रणालीतील ॲसेट्स**<br>१.१ विदेशी मुद्रेतील कर्जे<br>१.२ इतर<br>**२. भारतामधील इतरांकडे असलेले ॲसेट्स**<br>११.१ विदेशी मुद्रेत भारतामधील बँक क्रेडिट [४]<br>११.२ इतर | | | |
| **३. विदेशातील विदेशी मुद्रेतील ॲसेट्स** | | | |

[१] कंत्राटी परिपक्वत १ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असलेले

[२] कंत्राटी परिपक्वत १ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असलेले

[३] रुपयांमध्ये स्वॅप न केलेल्या भागात असलेले

[४] एफसीएनआर (बी) ठेवींमधून कर्जे

[५] विदेशात ठेवलेल्या शिल्लकीमधील (म्हणजे, नोस्ट्रो खात्याचा रोकड घटक, एसीयु (युएस डॉलर) खात्यातील डेबिट बॅलन्सेस आणि एसीयु देशांमधील वाणिज्य बँकामधील क्रेडिट बॅलन्सेस) २) अर्हता असलेल्या सिक्युरिटीज मधील गुंतवणुकी व लघु मुदतीच्या विदेशी ठेवी ३) ट्रेझरी बिलांसह विदेशी मनी मार्केटमधील संलेख आणि ४) विदेशी शेअर्स व बॉंड्स

| | जवळच्या हजारापर्यंत राउंड ऑफ केलेली रुपयातील रक्कम |
|---|---|
| **५) डिफरंशियल/झीरो सीआरआर प्रिस्क्रिप्शनच्या अटीवर इतरावरील बाह्य जबाबदाऱ्या (१ + २)**<br>**६) सीआरआर प्रिस्क्रिप्शन पूर्णपणे लागु असलेल्या बाह्य जबाबदाऱ्या(४)**<br>**७) निव्वळ आंतर बँकीय जबाबदाऱ्या (फॉर्म अ मधील १ ते ३)**<br>**८) झीरो प्रिस्क्रिप्शनमध्ये येणाऱ्या अन्य जबाबदाऱ्या**<br>**९) झीरो सीआरआर प्रिस्क्रिप्शन लागु असलेल्या जबाबदाऱ्या (५ + ७ + ८)** | |
| **मेमो आयटम्स** | |
| **१. आंतर बँकीय जबाबदा-या** | |
| १.१ एकूण आंतर बँकीय जबाबदा-या | |
| १.२ वजा : मुदत जबाबदा-या (परिपक्वता १ वर्ष ) | |
| १.३ निव्वळ (१.१ १.२) | |
| **२. आंतर बँकीय ॲसेट्स** | |
| २.१ एकूण आंतर बँकीय ॲसेट्स | |
| २.२ वजा - मुदत ॲसेट्स (परिपक्वता १ वर्ष) | |
| २.३ निव्वळ (२.१ २.२) | |
| **३. एसीयु डॉलर निधी** | |

प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही

१. पदनाम

२. पदनाम

**जोडपत्र - ब**

**बँकेचे नावः**

**(रुपयातील रक्कम जवळच्या हजारापर्यंत राउंड ऑफ करावी)**

| बाबी | पुस्तकी मूल्यानुसार आउटस्टँडिंग | पूनर्मूल्यांकन मूल्य |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१. मंजुरी प्राप्त सिक्युरिटीजमधील गुंतवणुकी** (१.१ + १.२)<br><br>१.१ सरकारी प्रतिभूतींमधील गुंतवणुक (१.१.१ + १.१.२) = फॉर्म अ मधील बाब ५(अ)<br>१.१.१ लघुमुदतीच्या [1]<br>१.१.२ दीर्घ मुदतीच्या [2]<br>१.२ इतर मंजुरी प्राप्त सिक्युरिटीजमधील गुंतवणुकी = (फॉर्म अची बाब ५ (ब))<br>**२) मंजुरीप्राप्त नसलेल्या सिक्युरिटीज मधील गुंतवणुक**<br>(२.१ + २.२ + २.३ + २.४)<br>२.१ पुढीलमधील गुंतवणुक –कमर्शियल पेपर<br>२.२ युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया व म्युच्युअल फंडांचे युनिट्स<br>२.३ खालील प्रमाणे दिलेले शेअर्स<br>२.३.१ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम<br>२.३.२ खाजगी कॉर्पोरेट क्षेत्र'<br>२.३.३ सार्वजनिक वित्तीय संस्था<br>२.४ खालील संस्थांनी दिलेले बॉंड्स/डिबेंचर्स/सिक्युरिटी रिसीटस् /पास थ्रु प्रमाणपत्रे<br>२.४.१ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम<br>२.४.२ खाजगी कॉर्पोरेट क्षेत्र'<br>२.४.३ सार्वजनिक वित्तीय संस्था<br>२.४.४ इतर (तपशील द्यावा) | | |
| मेमो आयटम्स | | |
| **१. प्रायमरी मार्केटमधील शेअर्स/डिबेंचर्सबाबत गुंतवणुक**<br>**२. प्रायव्हेट प्लेसमेंट मार्फत गुंतवणुक** | | |

प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सह्या

१. (पदनाम)
२.

२ (पदनाम)

[1] कंत्राटी परिपक्वता १ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असलेले
[2] कंत्राटी परिपक्वता १ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असलेले

**जोडपत्र २**

**बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९**
**फॉर्म ८**
**(नियम १३ अ)**
**(कलम १८ व २४)**

**बँकिंग कंपनीचे नावः**
**रिटर्न सादर करणाऱ्या**
**अधिकाऱ्याचे नाव आणि पदनामः**

......... महिन्यासाठी, डिमांड व टाईम जबाबदाऱ्या,
आणि रोकड, सुवर्ण आणि बोजाखाली नसलेल्या
मंजुरीप्राप्त सिक्युरिटींचे विवरणपत्र

(संबंधित महिन्याच्या अखेरीनंतर २० दिवसांच्या
आत रिझर्व बँकेकडे सादर करावयाचे)

(जवळच्या हजार रुपयांपर्यंत राउंड ऑफ करावे)

| | |
|---|---|
| | <u>व्यवहार बंद केल्यानंतर</u><br><br>पहिला दुसरा तिसरा<br>पर्यायी पर्यायी पर्यायी<br>शुक्रवार शुक्रवार शुक्रवार<br>@ @ @ |
| **भाग १**<br>१ बँकिंग प्रणालीवरील भारतामधील जबाबदाऱ्या (एखाद्या प्रादेशिक ग्रामिण बँकेने तिच्या प्रायोजक घेतलेले कर्ज सोडून)<br>अ) डिमांड जबाबदाऱ्या<br>१) भारतीय स्टेट बँक, सहाय्यक बँका व कॉरेस्पाँडिंग नवीन बँकांच्या चालु खात्यातील शिल्लक<br>२) इतर डिमांड जबाबदाऱ्या<br><br>ब) टाईम जबाबदाऱ्या<br>१ ची बेरीज<br><br>२. भारतामधील इतरांवरील जबाबदाऱ्या (रिझर्व बँक, एक्झिम बँक आणि नॅशनल बँक फॉर अग्रिकल्चर व रुरल डेव्हलपमेंट ह्यांच्याकडून घेतलेली कर्जे सोडून)<br>अ) डिमांड जबाबदाऱ्या<br>ब) टाईम जबाबदाऱ्या<br>२ ची एकूण बेरीज<br><br>३. कॅश इन हॅंड<br>४. रिझर्व बँकेतील चालु खात्यातील शिल्लका<br>५. भारतामधील बँकिंग प्रणालीकडील ॲसेट्स<br>अ) पुढीलमध्ये चालु खात्यातील शिल्लक<br>१) भारतीय स्टेट बँक, सहाय्यक बँका व नवीन कॉरेस्पाँडिंग | |

| | |
|---|---|
| बँका<br>२ इतर बँका व अधिसूचित वित्तीय संस्था<br>ब) बँका व अधिसूचित वित्तीय संस्था ह्यामधील इतर खात्यातील शिल्लक<br>क) मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस<br>ड) बँकांना दिलेल्या अग्रिम राशी (म्हणजे बँकांकडून असलेले येणे)<br>ई) इतर ॲसेट्स<br>५ ची एकूण बेरीज<br><br>६. चालु खात्यातील निव्वळ शिल्लक<br>= ५ (अ) (१) - १ (अ) (१)<br>७. बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९४९ व्या कलम १८ व २४ साठी, निव्वळ जबाबदाऱ्या<br>= बँकिंग प्रणालीवरील निव्वळ जबाबदाऱ्या + इतर डिमांड व टाईम जबाबदाऱ्या<br>= (१-५) + २, (१-५) ही धन संख्या असल्यास<br>किंवा<br>फक्त २, (१-५) ही ऋण संख्या असल्यास<br><br>**भाग ब**<br><br>(फक्त अधिसूचित नसलेल्या बँकांसाठी)<br>८. बँकिंग रेग्युलेशन १९४९ च्या कलम १८ खाली, ठेवण्यासाठी आवश्यक असलेला किमान राखीव निधी (मागील दुसऱ्या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या ७ च्या ३ टक्के)<br><br>९. प्रत्यक्ष ठेवलेला रोख राखीव निधी = ३, ४ व ६ ची एकूण बेरीज.<br><br>१० ८ पेक्षा ९ ची अधिकता.<br><br>**भाग क**<br><br>११. बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २४ खाली ठेवणे आवश्यक असलेली ॲसेट्सची किमान रक्कम (मागील दुसऱ्या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी, ७ च्या २५ टक्के किंवा विहित केलेल्या टक्केवारीनुसार रक्कम)<br><br>१२. (अ) भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ खाली एखाद्या अनुसूचित बँकेने ठेवावयाची शिल्लक<br>(ब) एखाद्या अनुसूचित बँकेने रिझर्व बँकेकडे ठेवलेली प्रत्यक्ष शिल्लक<br>(क) (ब) ची रक्कम (अ) पेक्षा किती जास्त आहे.<br><br>१३. प्रत्यक्षात ठेवलेले ॲसेट्स<br>(अ) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ११(२) खाली भारताबाहेर इनकॉर्पोरेट झालेल्या एखाद्या बँकिंग | |

| | |
|---|---|
| कंपनीने रिझर्व बँकेकडे ठेवलेली रोख रक्कम.<br>(ब) कॅश इन हँड किंवा एखाद्या अनुसूचित नसलेल्या बँकेबाबत, वरील १० मध्ये दाखविलेल्यानुसार, ८ पेक्षा ९ किती जास्त आहे.<br>(क) वरील १२ (क) मध्ये दाखविल्यानुसार रिझर्व बँकेकडे असलेली अतिरिक्त शिल्लक.<br>(ड) अनुसूचित बँकेने ठेवलेल्या चालु खात्यातील निव्वळ शिल्लक = वरील ६<br>(ई) प्रादेशिक ग्रामिण बँकेने तिच्या प्रायोजक बँकेकडे ठेवलेल्या स्थिर ठेवी किंवा कॉल स्वरुपातील शिल्लक रकमा<br>(फ) विद्यमान बाजार मूल्यापेक्षा अधिक नसलेल्या दराने मूल्यांकन केलेले सोने.<br>(ग) रिझर्व बँकेने ठरविलेल्या मूल्यांकन रितीच्या आधाराने मूल्यांकन केलेल्या ताबायुक्त नसलेल्या मंजुरप्राप्त सिक्युरिटीज्<br>(ह) रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ११(२) खाली भारताबाहेर इनकॉर्पोरेट झालेल्या एखाद्या बँकिंग कंपनीने, रिझर्व बँकेने ठरविलेल्या मूल्यांकन रितीने मूल्यांकन केलेल्या, रिझर्व बँकेकडे ठेवलेल्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज्<br><br>(अ) ते (ह) ची एकूण बेरीज<br>१४, १३-११<br>(अतिरिक्त+, तूट-) | |

दिनांक.......... सही.............

**टीप :** ह्या अहावालाबाबत, 'बँकिंग प्रणाली' ह्या संज्ञेचा अर्थ, भारतीत्य स्टेट बँक, सहाय्यक बँका, कॉरेस्पाँडिंग नवीन बँका, प्रादेशिक ग्रामिण बँका, इतर बँकिंग कंपन्या, सहकारी बँका आणि बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम १८ ला दिलेल्या स्पष्टीकरणातील खंड (ड) खाली भारत सरकारने अधिसूचित केलेल्या इतर बँकिंग कंपन्या असा असेल.

@ तारखा द्याव्यात. (निगोशिएबल इंस्ट्रुमेंटस् अधिनियम, १८८१ खाली (१८८१ चा २६) जेथे शुक्रवारी सुट्टी असेल तेथे मागील कामाच्या दिवसाची तारीख द्यावी)

**परिशिष्ट**

**महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकाची यादी**

| अनु.क्र. | परिच्छेद क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | १.२ | आरबीआय /२०११-२०१२/४३४ डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी.८६/१२.०१.००१/२०११-१२ | ०९/०३/२०१२ | भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ चे कलम ४२(१) कॅश रिझर्व रेशो ठेवणे. |
| २ | १.४,१.५, १.७ | डीबीओडी.क्र.एलइजी . बीसी.३४/सी.२३३ए-८५ | २३/०३/१९८५ | डिमांड लायाबिलिटीज, टाईम लायाबिलिटीज, ओडीटीएल |
| ३ | १.७ | डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी १४९/सी २३६(जी)७१ | २७/१२/१९७१ | ओडीटीएल |
| ४ | १.७ | डीबीओडी.क्र. बीसी.५८/ १२.०२.००१/९४-९५ | १३/०५/१९९५ | खरेदी केलेल्या बिलांवरील मार्जिन मनी |
| ५ | १.९ | डीबीओडी.क्र.बीसी. १११/१२.०२.००१/९७ | १३/१०/१९९७ | विदेशातील बँकांकडून कर्ज घेणे-राखीव निधी आवश्यक ठेवणे |
| ६ | १.१० | डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी.१४/१२.०१.००१/२००३-०४ | २१/०८/२००३ | प्रेषण सुविधांसाठी संगत बँकांबरोबर व्यवस्था |
| ७ | १.११( सी) | डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी. ४०/सी.२३६(जी)एस प ई एल -८६ | २७/०३/१९८६ | डीआयसीजीसी कडून मिळालेली रक्कम |
| ८ | १.११ (डी, ई, एफ) | डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी. ९८/सी.९६(आर ई टी)-८६ | १२/०९/१९८६ | एनडीटीएल पासून सूट - कोर्ट रिसीव्हर, विमाकंपनी आणि ईसीजीसी कडून पावती |
| ९ | १.११ (जी) | डीबीओडी.क्र.बीसी.१९१ /१२.०१.००१/९३ | ०२/११/१९९३ | बँकर्स ॲक्सेप्टन्स पॉलिसीखालील (बीएएफ) जबाबदाऱ्या |
| १० | १.११(एच) | आर पी सी डी.बीसी.क्र.०६/०९.०१.०१/२००६-०७ | ०७/०७/२००६ | स्वर्णजयंती स्वरोजगार योजना |
| ११ | १.११ (जे) | आर पी सी डी.बीसी. क्र.२/०५.०२.०२(आर जी)/ २००३-०४ | ०३/०७/२००३ | ग्रामिण गोडाऊन्सची बांधणी?नूतनीकरण/विस्तार करण्यासाठी कॅपिटल इनव्हेस्टमेंट सबसिडी योजना |
| १२ | १.१२ | आरबीआय /२००६-२००७/३३२ डीबीओडी.आर ई टी.बीसी.८४/१२.०१.००१/२००६-०७ | २०/०४/२००७ | सूट दिलेल्या वर्गांबाबत सीआरआर ठेवला जाणे |
| १३ | १.१२ | डीबीओडी.क्र.बीसी.५ /१२.०१.००१/२००१-०२ | ०७/०८/२००१ | आंतर - बँकीय जबाबदाऱ्यांबाबत फॉर्म अ मध्ये अहवाल पाठविणे |
| १४ | १.१२(२) | डीबीओडी.क्र.बीसी.८२ /१२.०१.००१/२००१-२००२ | २६/०३/२००२ | सीआरआर ठेवणे - एसीयु डॉलर निधी - सूट |
| १५ | १.१२(३) | डीबीओडी.आय बी एस.बीसी.८८/ २३.१३.००४/२००२-०३ | २७/०३/२००३ | स्पेशल एकॉनॉमिक झोन्समधील (एसईझेड) ऑफ शोअर बँकिंग युनिट्स (ओबीयु) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | १.१३ | डीबीओडी.क्र.बीसी.५०/ १२.०१.००१/२०००-०१ | ०७/११/२००० | अनुसूचित वाणिज्य बँकांकडून (जोडपत्र अ व ब मधील) माहिती गोळा करणे |
| १७ | १.१३, १.१७ | डीबीओडी.क्र . आर ई टी.बीसी.११३/१२.०१.००१/२०११-१२ | २९/०६/२०१२ | विदेशी मुद्रा (अनिवासी) एफसीएनआर (बी) योजनेवरील सीआरआर ठेवणे |
| १८ | १.१५ | डीबीओडी.क्र.बीसी.५४/ १२.०१.००१/२००२-०३ | २७/१२/२००२ | कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) ठेवणे |
| १९ | १.१६ | आरबीआय /२००६-२००७/३३१ डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी.८२/१२.०१.००१/२००६-०७ | २०/०४/२००७ | कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) ठेवणे |
| २० | १.१७ | आरबीआय /२००६-२००७/१०६ | १०/०८/२००६ | भारतीय रिझर्व बँक चे कलम ४२(१) |
| २१ | १.१८ | डीबीओडी.बीसी.८९/ १२.०१.००१/९८-९९ | २४/०८/१९९८ | अनुसूचित वाणिज्य बँकांकडून (जोडपत्र अ व ब मधील) माहिती गोळा करणे |
| २२ | १.१८ | डीबीओडी.क्र.बीसी.५०/ १२.०१.००१/२०००-०१ | ०७/११/२००० | बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ चे कलम २४ -स्टॅटयुटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवणे |
| २३ | २ | डीबीओडी क्र.आर ई टी.बीसी.९१/१२.०२.००१/२०१०-११ | ०९/०५/२०११ | बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ चे कलम २४ - स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवणे |
| २४ | २(२) | परिपत्रक डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी.९५/१२.०२.००१/२०११-१२ | १७/०४/२०१२ | बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ चे कलम २४ - स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवणे - मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी (एमएसएफ) |
| २५ | २ (सी)(१) | डीबीओडी. क्र.आर ई टी.बीसी. ९१/१२.०२.००१/२०१०-११ | ०९/०५/२०११ | स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर) ठेवणे |
| २६ | २ टीप (१) (२) | डीबीओडी.क्र. आर ई टी.बीसी. ९१/१२.०२.००१/२०१०-११ | ०९/०५/२०११ | स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो ठेवणे |
| २७ | २ टीप (२) | डीबीओडी.क्र.आर ई टी.बीसी.३६/१२.०२.००१/२००९-१० | ०१/०९/२००९ | स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो ठेवणे |
| २८ | २.२ | डीबीओडी.क्र. बीपी.बीसी.१९/२१.०४.१४१/ २०११-१२ | ०१/०७/२०११ | बँकांद्वारे, गुंतवणुक पोर्ट फोलियोचे वर्गीकरण, मूल्यांकन व कार्य करण्यासाठी प्रुडेंशियल नॉर्म्स. |
| २९ | २.२ | डीबीओडी.क्र.बीसी.८७/१२.०२.००१ /२००१-२००२ | १०/०४/२००२ | एसएलआर साठी सिक्युरिटीज् चे मूल्यांकन |
| ३० | २.४(२) | सीपीसी.बीसी.६९/२७९ (ए)-८४ | ३०/१०/१९८४ | स्टॅट्युटरी लिक्विडिटी आवश्यक्ता ठेवली जाण्या बाबत माहिती- विशेष अहवाला साठी पूरक माहिती |